

फर्मागुडी : गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित पहिल्या डॉ. डिमेलो व्याख्यान व परिषदेत भारतीय भूतांत्रिक संस्था (आयजीएस), गोवा शाखा पुरस्कृत सुवर्णपदक तन्वी म्हार्दोळकर हिला देताना रामचंद्र भाटकार. सोबत इतर मान्यवर.

# गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयात 'डॉ. व्हिक्टर डिमेलो' व्याख्यान उत्साहात

पणजी, ता. ९ : गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभाग आणि भारतीय भूतांत्रिक संस्था, गोवा केंद्र आयोजित पहिली डॉ. व्हिक्टर डिमेलो व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यान व परिषदेत भारतीय भूतांत्रिक संस्था (आयजीएस), गोवा शाखा पुरस्कृत सुवर्णपदक तन्वी म्हार्दोळकर हिला देण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर आयआयटी मुंबईच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य रामचंद्र भाटकार, भारतीय विज्ञान संस्थेतील प्राध्यापक व आयजीएसचे अध्यक्ष जी. एल. शिवकुमार बाबू, प्राचार्य डॉ. व्ही. एन. शेट, स्थापत्य विभाग प्रमुख डॉ. के. जी. गुप्ता, डॉ. पूर्णानंद सावईकर व डॉ. निशा नाईक उपस्थित होते.

पारंपरिक पद्धतीच्या उद्घाटनानंतर निमंत्रक डॉ. पूर्णानंद सावईकर यांनी या व्याख्यान व परिषदेचा उद्देश विशद केल्यानंतर उद्घाटक रामचंद्र भाटकार यांनी प्रत्येक स्थापत्य प्रकल्पातील मृद अभियांत्रिकीचे महत्त्व सांगितले. यावेळी त्यांनी अनेक प्रतिष्ठेच्या देशाविदेशातील प्रकल्पांवरील आपले अनुभव कथन केले. डॉ. के. जी. गुप्ता व डॉ. व्ही. एन शेट यांनी महाविद्यालयात चालू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्राध्यापक स्मिता हळदोणकर यांनी कर्नाटक, गोवा व महाराष्ट्रातून आलेल्या उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत केले. २०१६ मध्ये भूतांत्रिक अभियांत्रिकी विषयात पहिल्या आलेल्या अमित लाड याला तीन हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. प्रा. माधव व प्रा. दीपंकर चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली सांगता कार्यक्रम झाला. उपस्थित प्रतिनिधींना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. डॉ. श्वेता प्रसन्ना यांनी आभार मानले.